# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १२.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ११/१२/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७९ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ४६,६००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.११/१२/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०५ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ३१.०३ लिटर दारू एकुण ६६,५४०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**तडीपार आदेशाचे उल्लघंन करणाऱ्या विरूध्द विशेष कार्यवाही:—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामधुन तडीपार केलेल्या इसमांनी तडीपारीचे आदेशाचे उल्लघन केल्याचे दिनांक ११/१२/२०२२ रोजी पोस्टे कुरूंदा येथे ०१ इसमांविरूध्द कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

**खुनाचा प्रत्यन करणा—या विरूध्द अपराध दाखल :—**

दिनांक ११/१२/२०२२ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३०७, ३२६, ३२४, १४३,१४७,१४८,१४९,५०४ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील नमुद आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन जुने भांडणाचे कारणावरून आरोपी क्र १ याने त्याच्या हातातील कोयत्याने जिवे मारण्याची उद्देशाने फिर्यादीचे डोक्यात मारून गंभीर जख्मी केले तसेच फिर्यादीस मानेवर कोयता मारत असतांना फिर्यादीचे मित्राने हातातने वार ताडला त्यामुळे तो गंभीर जख्मी झाला व आरोपी क्र २ ते ४ व इतर मित्राने दगडाने व काठयाने जिवे मारण्याचे उद्देशाने फिर्यादी व फिर्यादीचा मित्र यांना मारून गंभीर जख्मी केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत

**किरकोळ दुखापत :—**

दि.११.१२.२०२२ रोजी पोस्टे बासंबा येथे कलम ३२४, १४३, १४४, १४६, १४७, १४८, १४९, ३५४, ४३५, ३२३, ५०४ भादंवि प्रमाणे गुन्हे नोंद असुन पुढील तपास बासंबा पोलीस करत आहेत.